# पायाभूत सुविधा आणि रिअल इस्टेट क्षेत्राला नवसंजीवनी



जागतिक पातळीवरील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ भारताच्या पायाभूत सुविधा आणि रिअल इस्टेट क्षेत्रासाठी आत्मविश्वास वाढवणारा ठरतो. सार्वजनिक भांडवली खर्च ₹१२.२ लाख कोटींवर नेणे आणि 'इन्फ्रास्ट्रक्चर रिस्क गॅरंटी फंड'ची स्थापना यामुळे दीर्घकालीन धोरणात्मक प्रकल्पांना गती मिळेल आणि खासगी गुंतवणुकीलाही चालना मिळेल, असा स्पष्ट संकेत सरकारने दिला आहे. एनआरआय गुंतवणूकदारांनाही या अर्थसंकल्पाचा लाभ होणार आहे. थेट इक्विटी गुंतवणुकीची मर्यादा वाढवणे, अनुमानित कर प्रणालीतील सवलती, मालमत्ता व्यवहार सुलभ करणे आणि परदेशी रेमिटन्सवरील टीसीएस कमी करणे यामुळे टियर-१ आणि टियर-२ शहरांतील निवासी व व्यावसायिक मालमत्तांमध्ये एनआरआयंचा रस वाढण्याची शक्यता आहे.

**– अमित परांजपे**, संचालक –
व्यवसाय विकास,
परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड